**विशेष दिवाणी दावा क्र. ४७ / २०१९**

रेश्मा इंगळे / तानगावडे
वि.
समीर इंगळे / तानगावडे वगैरे

**<u>आदेश निशाणी क्र. ७७ वर</u>**

१. वादी यांना या प्रकरणामध्ये महत्वाची कागदपत्रे दाखल करावयाची आहेत. त्यास परवानगी दयावी याकरिता हा अर्ज देण्यात आलेला आहे. प्रतिवादी क्र. १ते ३ यांनी त्याला तीव्र आक्षेप नोंदवलेला आहे. सदर कागदपत्रे उशीरा दाखल करण्यात आलेली आहेत. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा असे त्यांनी नमूद केले आहे.

२. प्रकरणात अदयाप सर्व प्रतिवादी यांनी समन्सची बजावणी झालेली नाही. नि. क्र. ५ प्रमाणे च्या अर्जावर युक्तीवादासाठी प्रकरण आहे. या प्रकरणातील वाद विषयाचा गुणदोषावर अंतिम व योग्य निर्णय होण्यासाठी प्रस्तुत कागदपत्रे आवश्यक आहेत असे वादी यांनी सांगितले. ती कागदपत्रे रेकॉर्डवर दाखल करण्यास परवानगी दिली तर विरुध्द पक्षकार यांचेवर कोणताही अन्याय होणार नाही. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. सोबतच्या यादीप्रमाणे कागदपत्र दाखल करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

दिनांक : २५/०३/२०२१

( श्रीकृष्ण हरिभाऊ इनामदार )
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पंढरपूर.